महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- १४४२/सकअमविप/२०२१/२४ दिनांक :- ०४ ऑगस्ट,२०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२१**
**सुधारित अंतिम निकाल**
**जाहिरात क्रमांक - २७१/२०२१**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ०६ मार्च, २०२२ रोजी मुंबई केंद्रावर घेण्यात आलेल्या **सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२१** च्या दिनांक ३१ मे, २०२२ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक १२०४/२०२२ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक ०७ जुलै, २०२३ रोजीच्या निर्णयानुसार विषयांकीत परीक्षेचा सुधारित निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ०४ ऑगस्ट,२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व सीमांकन गुण आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

३. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. प्रस्तुत परीक्षेचा सुधारित निकाल मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

ठिकाण :- नवी मुंबई

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ. प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
नवी मुंबई